प्रेसनोट दि. ०६.०९.२०२२

लोकसेवक अल्ताफ मकबूल मकानदार, वय ४४ वर्षे, शाखा अभियंता,नगर रचना विभाग, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यालय कुपवाड रा. अल्फोन्सा स्कूल जवळ, मिरज ता.मिरज जि. सांगली यांचे विरूध्द लाच मागणी बाबत कारवाई सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांनी दोन प्लॉटचे एकत्रीकरण व त्या प्लॉट वर बांधकाम परवाना संदर्भातील कामा संदर्भातील दोन्ही फाईल्स बांधकाम विभाग महानगरपालिका कार्यालय कुपवाड येथे जमा केल्या आहेत. सदरचे काम पुर्ण करून देण्यासाठी सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका सांगली कार्यालय कुपवाड येथील शाखा अभियंता मकानदार यांनी तक्रारदार यांचेकडे ४५,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.१०.११.२०२१ रोजी इकडील कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि.१०.११.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीपमाणे केलें पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार काम करीत असले कंपनीकडून महानगरपालिका कार्यालय कुपवाड येथे दिलेल्या बांधकाम परवान्याचे काम करून देण्यासाठी लोकसेवक मकानदार यांनी तक्रारदार यांचेकडे ४५०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेले आहे.

त्यानंतर दि.१०.०२.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे लोकसेवक मकानदार शाख अभियंता यांची पुन्हा पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक मकानदार यांनी तक्रारदार यांचेशी नवीन कामासंदर्भात चर्चा करून जुने काम करून दिल्याबाबत प्रथम ४०,०००/- रूपये व चर्चे अंती ३०,०००/- रूपये लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

लोकसेवक मकानदार यांना तक्रारदार यांचेवर शंका आल्याने त्यांनी तक्रारदार यांचेकडून लाच स्विकारली नाही.

लोकसेवक अल्ताफ मकबूल मकानदार, वय ४४ वर्षे, शाखा अभियंता,नगर रचना विभाग, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यालय कुपवाड रा. अल्फोन्सा स्कूल जवळ, मिरज ता.मिरज जि. सांगली यांचे विरुध्द एम.आय.डी.सी. कुपवाड पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमा प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक, श्री.गुरूदत्त मोरे तत्कालीन पोलीस निरीक्षक तसेच श्री.संजय भिलारे पोलीस निरीक्षक, दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, संजय संकपाळ, सिमा माने, भास्कर भोरे, प्रितम चौगुले, धनंजय खाडे, राधिका माने, रविंद्र धुमाळ, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with Oken Scanner

Scanned with OKEN Scanner